कार्यालय,

कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग, रुईभर जलशुध्दीकरण केंद्राजवळ,तुळजापुर रोड,उस्मानाबाद.

# खरेदीपुर्व जाहीर नोटीस

उस्मानाबाद जिल्हयातील सर्व लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग,रुईभर जलशुध्दीकरण केंद्राजवळ तुळजापुर रोड,उस्मानाबाद यांच्या कार्यक्षेत्रातील **मौ.कलदेव निंबाळा ता.उमरगा** जि.उस्मानाबाद या गावच्या शिवारातील खालील जमीन जमीनधारक यांच्या मालकीची जमीन मौ. उमरगा वाढीव पाणी पुरवठा योजनासाठी संपादीत करणे प्रस्तावीत आहे.

| अ.क्र. | जमीन धारकाचे नांव | गांव व तालुका | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | संपादीत करावयाचे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी प्रेमनाथ अहंकारी<br>विठ्ठल प्रेमनाथ अहंकारी<br>बालाजी हरी अहंकारी<br>मधुकर हरी अहंकारी | मौ.कलदेव निंबाळा ता.उमरगा | 104 | 13 हे. 11 आर | 0 हे. 81 आर |

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण03/2015/प्र.क्र.34/2 मंत्रालय,मुंबई दि.12/05/2015, दि. 30/09/2015 व दि. 25/01/2017 प्रमाणे खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीसाठी थेट खरेदी पध्दतीने घेणे बाबतच्या तरतुदीनुसार मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याप्रमाणे खाजगी खरेदी व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचे प्रस्तावीत आहे.

संपादन करावयाचे क्षेत्र हे तपशीलवार संयुक्त मोजणी अहवालाप्रमाणे विचारात घेण्यात आलेले आहे. सदर जमीनीबाबत जमीन मालकाच्या हिस्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा बाकी, लिज कर्ज बक्षीसपत्र, जप्ती, मदार व इतर हक्क असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसाचे आत पुराव्यासह लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी 10.00 ते सायं. 5.45 वाजेपर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने उप विभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय, उमरगा या कार्यालयास कळवावे. मुदतीत कोणतीही हरकत अथवा उजर न आल्यास सदरील जमीन मालक उपरोक्त प्रमाणे जमीन मालकाची जमीन ही मिळकत निर्विवाद व निर्जोखमी असल्याचे समजुन उप विभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय, उमरगा हे पुढील सरळ / थेट खरेदीचा व्यवहार करतील. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत अथवा उजर आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही. याची सर्व जनतेनी नोंद घ्यावी.

उप विभागीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
भुसंपादन अधिकारी उमरगा
उमरगा

Adv. V.B. DESHMUKH
B.A.LL.B.
Anand Nagar,Osmanabad

दिनांक 25/09 /2018

तर्फे

ॲड.-------------------